# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.04.2025** **वारःशनिवार**

1. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित; दोन्ही सभागृहांमध्ये 100 टक्क्यांपेक्षा अधिक कामकाज
2. रेल्वे मंत्रालयाच्या 4 प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी; राज्यातल्या गोंदिया-बल्लारशाह रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाचाही समावेश
3. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील प्रकरणाची मुख्यमंत्र्यांकडून गंभीर दखल; चौकशी समिती स्थापन
4. ज्येष्ठ चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक मनोज कुमार यांचं निधन; आज मुंबईत अंत्यसंस्कार
5. नांदेड जिल्ह्यात आलेगाव इथं ट्रॅक्टर विहिरीत कोसळून 7 महिलांचा मृत्यू आणि
6. 57व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला संघाला विजेतेपद; तर पुरुष संघ उपविजेता

**अधिवेशन**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन काल संस्थगित झालं. 31 जानेवारी रोजी सुरू झालेल्या या अधिवेशनात, लोकसभेत 118 टक्के काम झालं आणि 16 विधेयकं संमत झाल्याचं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं. तर राज्यसभेत या अधिवेशन काळात 119 टक्के कामकाज झालं; आणि 14 विधेयकं संमत झाली असं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सांगितलं.

अधिवेशनात भरीव कामकाज झाल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू म्हणाले. वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभेत 14 तास, तर राज्यसभेत 17 तास चर्चा झाली, चर्चेदरम्यान एकदाही व्यत्यय आला नाही, असं रिजीजू यांनी सांगितलं. दरम्यान सरकारनं वक्फ सुधारणा विधेयक बळजबरीनं मंजूर करून घेतल्याचा आरोप काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी केला; हा आरोप रिजिजू यांनी फेटाळून लावला. सभापती ओम बिर्ला यांनीही सोनिया गांधी यांचं हे विधान दुर्दैवी असल्याचं म्हटलं आहे.

**मंत्रिमंडळ**

रेल्वे मंत्रालयाच्या सुमारे 18 हजार 658 कोटी रुपये खर्चाच्या 4 प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बैठकीनंतर नवी दिल्लीत माध्यमांना ही माहिती दिली. महाराष्ट्रातल्या गोंदिया - बल्लारशाह रेल्वेमार्गाचं दुपदरीकरण, तसंच गडचिरोली आणि मध्य प्रदेशातल्या राजनंदगाव या आकांक्षित जिल्ह्यांमधे मिळून 19 नवीन रेल्वे स्थानकांच्या उभारणीच्या कामांचा या प्रकल्पांमधे समावेश आहे. या प्रकल्पांमुळे इंधन तेलावरचा खर्च वाचून कार्बन उत्सर्जनाचं प्रमाणही कमी होईल. तसंच यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल असं वैष्णव यांनी सांगितलं. देशाच्या सीमा भागातील गावांच्या सर्वांगीण विकासासाठी, पूर्णपणे केंद्रपुरस्कृत असलेल्या व्हायब्रंट व्हिलेजेस या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यालाही केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली.

**मंगेशकर रुग्णालय**

पुण्यात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात, वेळेवर उपचार न मिळाल्याने गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. या घटनेची चौकशी करण्यासाठी धर्मादाय सह आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. या समितीत उपसचिव, कक्ष अधिकारी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय यांचे प्रतिनिधी, मुंबईच्या सर जे. जे. रुग्णालय समूहाचे अधीक्षक हे सदस्य असतील. या प्रकरणाची सखोल चौकशी तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीद्वारे करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. या

घटनेबाबत आंदोलन करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि संघटनांच्या भावना शासनाने समजून घेतल्या आहेत. सर्व नागरिकांनी संयम बाळगावा आणि प्रशासनाला सहकार्य करावं, असं आवाहन पवार यांनी केलं आहे. दरम्यान रुग्णालय प्रशासनानं या प्रकरणी समाज माध्यमांतून निवेदनाद्वारे आपलं म्हणणं मांडलं आहे.

**<u>महासूल विभाग</u>**

महसूल विभाग हा शासनाचा चेहरा असून पारदर्शक आणि गतिमान कामकाजाबरोबरच नव-तंत्रज्ञानाचा वापर करून, महसूल विभाग अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणं आवश्यक असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. पुण्यात आयोजित महसूल क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या दोन दिवसांच्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर भर द्यावा, कृत्रिम बुध्दीमत्तेसारख्या नवतंत्रज्ञानाचा वापर करावा, अशी अपेक्षा बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केली.

**<u>आरोग्य विभाग-धाराशिव</u>**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत धाराशिव जिल्ह्याला सहा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले आहेत. जागतिक आरोग्य दिनी म्हणजे येत्या 7 एप्रिल रोजी मुंबईत हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. याविषयी सविस्तर माहिती देणारा हा वृत्तांत......

**प्रजनन आणि बाल आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत पाच वर्षात सातत्याने बालमृत्यू कमी करणारा जिल्हा म्हणून धाराशिव जिल्ह्याला राज्यस्तरीय प्रथम क्रमांक जाहीर झाला आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कामाच्या वार्षिक मूल्यांकनात धाराशिव जिल्हा राज्यात दुसऱ्या स्थानी तर राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात उत्तम कामगिरी करणारा जिल्हा या श्रेणीत धाराशिव जिल्हा राज्यात दुसऱ्या स्थानी राहिला आहे. गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत धाराशिव जिल्ह्यात दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय पातळीवरील मूल्यांकन प्राप्त केल्याबद्दल द्वितीय पुरस्कार जाहीर झाला आहे तर राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमांतर्गत मोतीबिंद शस्त्रक्रिया मध्ये उद्दिष्टाच्या 94% काम करून धाराशिव जिल्हा राज्यात द्वितीय स्थानी राहिला आहे. सर्वाधिक रुग्णालयीन प्रसूती करणाऱ्या शासकीय रुग्णालयामध्ये धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील सास्तुर इथल्या ग्रामीण आरोग्य रुग्णालयास राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार जाहीर झाला आहे. देविदास पाठक आकाशवाणी वार्ताहर धाराशिव.**

**<u>मनोज कुमार निधन</u>**

हिंदी चित्रपटसृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मनोज कुमार यांचं काल सकाळी मुंबईत निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी अकरा वाजता मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. मनोज कुमार यांचं मूळ नाव हरिकृष्ण गिरी गोस्वामी असं होतं; मात्र देशभक्त नायक म्हणून त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखांमुळे भारतकुमार हे टोपणनाव त्यांना मिळालं. वो कौन थी, शहीद, रोटी कपडा और मकान, क्रांती, पूरब और पश्चिम, उपकार हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीतल्या त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<u>नांदेड मृत्यू</u>**

नांदेड जिल्ह्यात काल ट्रॅक्टर विहिरीत कोसळून झालेल्या अपघातात 7 महिला मजुरांचा मृत्यू झाला. काही महिलांना शेतमजुरीसाठी वसमत तालुक्यातील गुंज इथून नांदेड तालुक्यातील आलेगांव शिवारात घेऊन जात असताना चालकाचा ताबा सुटल्याने ट्रॅक्टर विहिरीत कोसळला. जवळच काम करत असलेल्या शेतमजुरांनी विहिरीत पडलेल्या दोन महिला आणि एका पुरुष मजुराला बाहेर काढलं. दरम्यान मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री निधीतून पाच लाखांची मदत जाहीर केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**राष्ट्रीय खोखो**

जगन्नाथ पुरी इथं काल झालेल्या 57व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या महिला संघाने दिमाखदार खेळी करत विजेतेपदावर आपलं नाव कोरलं. त्यांनी यजमान ओडिशावर 25-21 असा थरारक विजय मिळवला. प्रियांका इंगळे रेश्मा राठोड आणि अश्विनी शिंदे या अजिंक्य पदाच्या शिल्पकार ठरल्या. या स्पर्धेत देशातील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा राणी लक्ष्मीबाई पुरस्कार धाराशिव जिल्ह्याच्या तन्वी भोसले हिला जाहीर झाला. दरम्यान पुरुष संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. अंतिम सामन्यात रेल्वेच्या संघानं गतविजेत्या महाराष्ट्रावर 36-28 असा विजय मिळवला.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल लखनऊ सुपर जायंटस् संघानं मुंबई इंडियन्स संघावर 12 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना लखनऊच्या संघानं 20 षटकांत 8 गडी बाद 203 धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देताना मुंबईच्या संघाला 5 गडी बाद 191 धावा करता आल्या.

**हवामान**

राज्यात आज मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल तर विदर्भात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**